संक्षिप्त



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात करिअर कट्टाविषयी मार्गदर्शन करताना प्रा. आर. एस. गावडे. सोबत इतर.

## लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात करिअर कट्टाविषयी मार्गदर्शन

**दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) :** लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय, दोडामार्ग येथे राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या करिअर कट्टा उपक्रमाबाबत प्रा. आर. एस. गावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व करिअर कट्टा समन्वयक प्रा. एस. एस. पाडगांवकर उपस्थित होते. विद्यार्थिदशेत असताना विद्यार्थ्यांसमोर अनेक प्रलोभने असतात. परंतु त्यांचा विचार न करता जर विद्यार्थ्यांनि स्पर्धा परीक्षांचा विचार करून त्यासाठी प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असे मत प्रा. आर. एस. गावडे यांनी मांडले. पदवीसोबत विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये विकसित करून त्याद्वारे उत्कृष्ट उद्योजक बनू शकता, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले. महाविद्यालयातून किमान १५ विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना संपूर्ण मार्गदर्शन महाविद्यालयातर्फे केले जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. एस. एस. पाडगांवकर यांनी केले. आभार प्रा. पी. एस. प्रसादी यांनी मानले.